प्रदेशवादाचे राजकारण : एक चिकित्सक अध्ययन

मनोज कृष्णराव सरोदे
आर्टस् कॉलेज सिहोरा,
ता. तुमसर, जि. भंडारा

डॉ. शारदा महाजन
सहयोगी प्राध्यापक
एन. एम. डी. कॉलेज, गोंदिया

१. प्रस्तावना

लोकशाही राज्यव्यवस्थेत प्रदेशिक विकास महत्वाचा बनतो, तसेच जनतेचा वा लोकांचा विकासही. लोकांचा विकास व प्रदेशाचा विकास या कल्पना सामानार्थी समजल्या जात असल्या, तरी आधुनिक भांडवली व्यवस्थेत त्यांत द्वैत संभवते. एकतर विविध प्रदेशातील दळणवळण सुरूवात झाल्यावर लोकसंख्येच्या स्थलांतराला गती मिळते जी विविध प्रदेशात वेगवेगळया स्वरूपाची असते. नागरी प्रदेशांचा विस्तार होण्याबरोबरच औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेतून स्थलांतराला जशी चालना मिळते, तद्वतच नागरी भागांत एक नवीन औद्योगिक संस्कृती निर्माण होऊ लागते. नागरी/औद्योगिक जीवनशैली ग्रामीण जीवनपद्धतीपेक्षा खूपच निराळी असते. दृष्य पातळीवर – विविध सेवांची उपलब्धता, विविधता व वरकरणी जाणवणारी संपन्नता यामुळे ग्रामीण व नागरी भेद गडद बनतात; निदान तसे वाटतात.

याबरोबरच ग्रामीण जीवनातील संथपणा, स्वायत्तता व विविधता या सर्व बाबी औद्योगिक जीवनपद्धतीत टिकून राहात नाहीत. उदाहरणार्थ, मुंबईसारख्या महानगरात देशाच्या विविध प्रांतातील लोक राहात असल्याने एक बहुरंगी, बहुढंगी जीवनपद्धती विकसित होते, पण ती सभोवतालच्या ग्रामीण वातावरणापासून खूपच भिन्न असते. या भिन्नतेचा प्रामुख्याने ग्रामीण भागातील समाज जीवनावर मोठा परिणाम होतो. ज्यामध्ये आपल्या भागात (ग्रामीण भागात) विकासाची गती अत्यल्प असल्याची भावना जनतेमध्ये निर्माण होते. त्याचप्रमाणे शहरातील अथवा औद्योगिक विकास होत असलेल्या प्रदेशातील विकास ग्रामीण अथवा कमी विकास झालेल्या भागातील प्राकृतिक संसाधनांचा वापर करून होत असल्याची भावना देखील जनतेमध्ये निर्माण होते.

शिवाय सर्व नागरी भागांत (गर्दी, जागेची कमतरता, निश्चित वेळापत्रक, करमणुकीची मुबलक साधने इ.) खूप साम्यस्थळे असतात. ज्यामुळे ग्रामीण भागांत विविधता असते, तर नागरी भागांत सारखेपणा (याला साचेबंदपणा असेही म्हणता येईल) आढळतो. ग्रामीण भागांत वीज, पाणी, रस्ते, आरोग्यसेवा, शिक्षण यासारख्या मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असतो किंवा या सुविधांचा दर्जा असमाधानकारक असतो. शिवाय येथल्या समस्यांकडे प्रसारमाध्यमांचे साधारणपणे दुर्लक्ष होते. याउलट महानगरांतील चमचमाट, झगमगाट व प्रसारमाध्यमांचे सामर्थ्य यामुळे नागरी समस्यांकडे चटकन लक्ष वेधले जाते. या बाबी ग्रामीण भागांत जास्तच खटकतात व ग्रामीण विरूद्ध नागरी असे प्रदेशिक अस्मितेचे नवे परिमाण पाहायला मिळते. कधीकधी ग्रामीण विरूद्ध नागरी या समस्येलाच शेती विरूद्ध उद्योग असे रूपही मिळते. वर्तमान व्यवस्थेत नागरी/औद्योगिक भागांना झुकते माप मिळते किंवा सरकारी संसाधने मोठ्या प्रमाणात नागरी भागांत वापरली जातात व ग्रामीण भागांकडे त्यामुळे दुर्लक्ष होते, अशी भावना या संदर्भात व्यक्त होताना आढळते (दातार, २०१२).

२. प्रादेशिकता – ऐतिहासिक मागोवा

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेवेळी जी चर्चा होत होती, त्यातही मराठवाडा, विदर्भ व उर्वरित भाग असे तीन घटक महत्वाचे होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरही जे प्रशासनिक उपविभाग होते, त्यानुसार (औरंगाबाद, पुणे नागपूर व मुंबई) प्रादेशिक ओळख स्पष्ट होत गेली. त्यानंतर पंचायत समित्या व जिल्हा परिषदांच्या निर्मितीमुळे विकेंद्रित प्रशासनाचा एक प्रयोग लगेचच सुरू झाला. त्यामुळे संदर्भानुसार प्रादेशिक घटक जिल्हा किंवा तालुका स्तरावरही महत्व पावला. विशेषत: लोकशाही राज्यपद्धतीत लोकसंग्रह करण्याच्या संदर्भात प्रदेश या घटकाचे महत्व वाढले. देशाच्या पातळीवर राज्य हा एक प्रदेश ठरतो. जेव्हा समान विकासाचा मुद्दा किंवा संसाधनांच्या योग्य वाटपाचा मुद्दा राज्य स्तरावर विचारात घेतला जातो, तेव्हा राज्याच्या राजकारणात मराठवाडा, कोकण, पश्चिम किंवा उत्तर महाराष्ट्र यासारख्या विस्तीर्ण प्रदेशांचा विचार होतो. जिल्हा स्तरावर विचार करताना तालुका हा लहान प्रदेश महत्त्वाचा ठरतो. राज्य पातळीवरील राजकारणातही राज्योचे हित (किंवा मराठी, अमराठी भाषिकांचे हित) या मांडणीतून विविध राजकीय पक्षांत चुरस निर्माण होते. किंवा राजकारणात महत्व मिळवण्याच्या रणनीतीतली ती एक खेळी ठरू शकते.

महाराष्ट्राच्या राजकारणात भिन्न उपप्रदेशांचा समतोल विकास हा मुद्दा नेहमीच लक्षणीय महत्वाचा राहिला आहे. कधी हा मुद्दा प्रच्छन्नपणे पुढे आला, तर कधी तसे झाले नाही! मुख्यमंत्री कोणत्या प्रदेशातील असावा, हा प्रश्न ही या संदर्भात महत्त्वाचा आहे! यामुळे भिन्न प्रदेशांचा समतोल विकास हा प्रत्यही वापरला जाणारा पण नेमका अर्थ अस्पष्ट असलेला शब्दप्रयोग आहे. समतोल विकास म्हणजे समान विकास, की विकासाची समान संधी? संधी समान असली, तरी परिणाम समान असेल, याची खात्री नसते. भिन्न प्रदेशातील नैसर्गिक साधने भिन्न असल्याने त्यानुसार विकासाच्या शक्यताही कमी जास्त असतात. या स्थितीत सर्व प्रदेशांचा समान विकास शक्य आहे का? हा एक, तर तसे करणे वा हितावह ठरेल का? हा दुसरा, असे प्रश्न निर्माण होतात? सरकारी खर्चाची भिन्न प्रदेशात होणारी वाटणी कशी अन्याय्य आहे, हा मुद्दा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत गुजराथी व मराठी भाषिक प्रदेशांच्या संदर्भातही चर्चिला गेला होता.

३. सामाजिक भिन्नता

धर्म, भाषा व इतिहास या भिन्नभिन्न संदर्भात महाराष्ट्राचा विचार केला जातो. पण या सर्व बाबी एका प्रदेशाशी संबंधित किंवा तेथे घडलेल्या असतात. त्यामुळे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या संकल्पनांत विविध मूल्यांचा विचार शक्य असला, तरी अशा विचारात त्याचा भौगोलिक विस्तार व त्यातील विविधता यांचा समावेश होत नाही. पण महाराष्ट्राचा विचार करताना त्याच्या भौगोलिक अवकाशाचा – जो त्याचा इतिहास किंवा त्याची भाषा या घटकांएवढाच महत्वाचा आहे – विचार टाळता येत नाही. निदान सध्याच्या काळात तरी नक्कीच नाही. महाराष्ट्राच्या विभिन्न प्रदेशांतील लोकजीवन बरेचसे स्वायत्त असल्याने बोली भाषा, चालीरिती, आहारविहार यांत लक्षणीय फरक आहे (आंबेडकर, १९७८). भौगोलिक घटकांतील फरकांचा लोकजीवनावरील भिन्न परिणाम मात्र स्पष्ट दिसत नाही. या स्थितीत प्रादेशिक अस्मिता हा घटक सुट्या स्वरूपात फारसा परिणामकारक न ठरल्यामुळे; भाषा, रीतीरिवाज या घटकांतूनच प्रदेश हा घटक प्रतिबिंबित होतो. त्यानंतर शासनव्यवस्थेचा विस्तार होऊ लागल्यावर राजा किंवा राजवटीनुसार प्रदेश हा निराळा घटक महत्वपूर्ण ठरू लागला. ही प्रक्रिया आजतागायत चालूच आहे. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी मराठी भाषिक तीन ठळक भागांत विखुरले होते. निजामी राजवटीतील मराठवाडा, निजामाकडून इंग्रजांना मिळालेला व मध्य

प्रांताशी जोडलेला विदर्भ आणि मुंबई इलाख्यातील मराठी भाषिक प्रदेश व निरनिराळी संस्थाने म्हणजे उर्वरित महाराष्ट्र समान शासनयंत्रणेखालील या भिन्न प्रदेशांतही भौगोलिक घटकांमुळे निर्माण होणारे फरक होतेच; पण प्रादेशिक अस्मिता विकसित होण्यास समान प्रशासनिक यंत्रणेचा मोठाच हातभार लागला (पेंडसे, १९६५).

४.विकासातील असमतोल

विकासाच्या प्रक्रियेत नागरीकरणाला वेग आल्यामुळे नागरी लोकसंख्या वाढते, नागरी प्रदेशाचा विस्तार होतो, तर दुसरीकडे राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा उत्पन्नातील वाटा कमी होतो. या स्थितीत शेती व उद्योग यांच्या विकासात समतोल किंवा ग्रामीण व नागरी प्रदेशांत 'समानता' कशी साधायची, हा महत्वाचा मुद्दा ठरतो. स्थलांतरित लोक मुख्यत: नागरी भागांत येत असल्याने तेथे बहुभाषिकता एक सहज बाब बनते; त्यामुळे मराठी लोकांचे घटते प्रमाण हा मुद्दा नागरी प्रदेशांत महत्वाचा ठरतो व ग्रामीण विरूद्ध नागरी हा मुद्दा मराठी/अमराठी या स्वरूपात पुढे आणता येतो. प्रादेशिक अस्मितेच्या संदर्भात हे भिन्न पदर लक्षात घेणे आवश्यक आहे, कारण यापैकी कोणत्याही स्वरूपात प्रादेशिकतेचा वापर/उद्रेक होऊ शकतो. झपाटयाने विकसित होत असलेल्या शहरी भागांमधील विविध गरजांची पूर्तता होण्याकरिता आवश्यक सेवा व इतर छोटे उद्योग यांची निर्मिती शहरालगतच्या भागात व्हायला सुरूवात होते. याचा परिणाम केवळ नागरीच नव्हे तर त्याच्या जवळील परिसराच्या गतीशील विकासात होतो व अशा तऱ्हेने एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशापेक्षा अधिक गतिशील विकास साध्य करतो.

महाराष्ट्रातील विकासाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्राचा वाटा कमी होण अटळ आहे. याबरोबरच शेती क्षेत्रावर अवलंबून राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाणही कमी व्हायचे, तर शेतीक्षेत्राबाहेर – उद्योग व सेवा क्षेत्रांत – नवीन रोजगार निर्माण व्हायला पाहिजेत. ही प्रक्रिया पुरेशा वेगाने होत नसल्याने शेती क्षेत्रावर अवलंबून लोक पुरेशा वेगाने कमी होत नाहीत व शेती क्षेत्रावर अवलंबून राहणाऱ्यांचे सरासरी (दरडोई) उत्पन्न बिगरशेती क्षेत्रातील सरासरी उत्पन्नाच्या तुलनेत कमी राहते. आर्थिक विकासातील या मिश्र असमतोलाचे स्वरूप विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमधून प्रतिबिंबित होते. या आत्महत्यांतून एकाच वेळी व्यक्तिगत, कौटुंबिक, क्षेत्रीय (कृषी) व प्रादेशिक परिमाणे स्पष्ट होतात. आत्महत्या करणारी व्यक्ती जीवनातील विविध समस्यांमुळे एवढी हतबल झालेली असते की, या समस्यांच्या संभाव्य सोडवणुकीबद्दल कोणताच आशावाद त्या व्यक्तिला वाटू शकत नाही व या परिस्थितीला असमान विकास प्रामुख्याने कारणीभूत असल्याची भावना सर्वसाधारण जनतेमध्ये निर्माण होते. किंबहुना या परिस्थितीतून बाहेर निघण्याकरिता आपला प्रदेश स्वायत्त होणे अपरिहार्य आहे अशी जनतेकडून मागणी सुरू होते.

५.विकासातील आर्थिक घटकांचा असमतोल

१९८३ मध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्राच्या विकासातील असमतोलाचा अभ्यास करून मागास प्रदेशांचा अनुशेष मोजण्यासाठी व तो नाहीसा करण्याचे उपाय सुचवण्यासाठी वि. म. दांडेकरांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीचा अहवाल १९८४ साली प्रसिद्ध झाला. मात्र समितीच्या अहवालाचे पडसाद अनुशेषाच्या संदर्भात अजूनही उमटत राहतात. सर्व बाबतीत सभासदांचे एकमत न झाल्याने या समितीच्या अहवालात सभासदाची पुरवणी टिपणे व दोन असहमतीदर्शक टिपणे संलग्न केली होती. यापैकी वि.वि.बोरकरांच्या असहमती दर्शवणाऱ्या टिपणात असमतोल मोजण्याच्या पातळीचा मुद्दा

उपस्थित केला गेला होता. समितीने प्रदेश पातळीबरोबरच जिल्हा व तालुका अशा लहान एककांचीही मोजमापासाठी निवड केल्याने असमतोलाच्या मोजणीवर परिणाम होऊन विकासाचा अनुशेष सातत्याने कमी होईल, अशी भीती व्यक्त करत या पद्धतीला त्यांनी आपला विरोध दर्शवला होता खुद दांडेकर समितीनेच पुरेशा सविस्तर माहितीच्या अभावी दिलेल्या कालमर्यादेत जिल्हा पातळीवर विकासाचा असमतोल मोजावा लागल्याने असाचा दुसरा स्वतंत्र अभ्यास संपूर्णत: तालुका पातळीवर करावा, अशीही एक शिफारस केली होती. या शिफारशीची अंमलबजावणी झालेली नाही. आपल्या अहवालावर जनतेत व्यापक चर्चा व्हावी, अनुशेष दूर करण्याच्या धोरणांची अंमलबजावणी कशी होते, ते तपासणारी कायमस्वरूपी संस्थात्मक यंत्रणा निर्माण व्हावी, अशा या समितीच्या आणखी काही अपेक्षा होत्या (कळमकर, १९६९).

दांडेकर समितीने असमतोलाचा जो विचार मांडला, त्यापेक्षा हा असमतोल दूर करण्यासाठी समितीने अनुशेषाचा जो आकडा निश्चित केला, त्याकडेच सर्वांचे लक्ष केंद्रित झाले (काळे, १९८३). वित्तीय स्वरूपातील हा अनुशेषाचा आकडा वित्तीय स्वरूपात दूर झाला, तरीही विकासातील खरा समतोल संपूर्णत: नाहीसा न होता विकासातील वास्तविक अनुशेष शिल्लक राहू शकतो, याकडेही पुरेसे लक्ष गेलेले आढळत नाही. पण तरीही असमतोलाचे मोजमाप कोणत्या पातळीवर करावे, हा मुख्य मुद्दा शिल्लक राहतोच. प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्य सेवा, रस्ता किंवा पिण्याचे पाणी यांसारख्या सोयी गावपातळीवर विचारात घ्याव्या लागतील. माध्यमिक शिक्षण, बाजार, जलसिंचन यांसारख्या सोयींचा गावांचा समूह या पातळीवर विचार करावा लागेल; कारण प्रत्येक खेड्यात वा वाडीत या सुविधा स्वतंत्रपणे व किफायतशीर रितीने पुरवता येणार नाहीत. अशा पद्धतीने विचार करता काही घटक तालुका व जिल्हा पातळीवरही विचारात घ्यावे लागतील. अशा पुरेशा विकेंद्रीत पातळीवर विकासाचा असमतोल दूर होत आहे किंवा नाही, याचे मोजमाप करणे जरूरीचे ठरेल. अशा मोजमापाच्या निष्कर्षानुसार महाराष्ट्र सरकारने आजवर विकासाची जी धोरणे आखली, त्यांची परिणामकारकता ठरवता येईल.

६. निष्कर्ष:

विशिष्ठ भूप्रदेशातील सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थित्यंतरे त्या भागातील जनतेची मानसिकता दर्शवितात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा या भागातील जनता पश्चिम महाराष्ट्रातील जनतेच्या तुलनेत शासकीय मेहेरनजर या घटकाच्या अनुषंगाने स्वत:ला उपेक्षितच समजते. ग्रामीण व शहरी भागातील विकास साध्य करण्याकरिता आवश्यक निधीची निरंतर कमतरता व त्या अनुषंगाने येणारा अनुशेष, मूलभूत भौतिक सुविधांचा (कृषी, सिंचन, ऊर्जा, शैक्षणिक व आरोग्य संस्था, दळणवळणाची साधने, इत्यादी) अभाव, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, विविध विकास योजनांची अमंलबजावणी करण्यात शासकीय उदासिनता इत्यादी घटकांचा संयुक्त प्रभाव प्रदेशवादाला खत पाणी घालण्याचे काम करतो. त्याचप्रमाणे याच काळात समाजात नविन नेतृत्व उदयास येण्याची मोठी शक्यता देखील असते. अशा उपेक्षित जनतेच्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेले नेतृत्व गुण ज्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये निदर्शनास येतात त्या राजकीय पक्षाला या परिस्थितीचा पुरेपुर लाभ घेणे क्रमप्राप्त ठरते.

७. आधारग्रंथ सूची

1. आंबेडकर बी.आर. “भाषावार राज्य मिमांसा” सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८ प्रथम आवृत्ती
2. कळमकर आनंदराव, “विदर्भ राज्य झाले पाहिजे ते कां?” महाविदर्भ राज्य संघर्ष समिती, नागपूर, १९६९
3. काळे योगानंद, “विदर्भ विकास व त्याचा अनुशेष” भारतीय जनता पार्टी, नागपूर, १९८३
4. देव आर.के., “संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन” संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन विषयक दप्तर, दादा धर्माधिकारी/दास्ताने (संपा)
5. पेंडसे लालजी, “महाराष्ट्राचे महामंथन”, साहित्य सहकार संघ, मुंबई, १९६५
6. दातार माधव, महाराष्ट्र: एक संकल्पनेचा मागोवा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२, पृ १२६
7. पळशीकर सुहास, २०१४अ काँग्रेस – उत्तर काळातील संरचात्नात्मक कलाटणी देणारी निवडणूक, *समाज प्रबोधन पत्रिका,* खंड ५२, अंक २०६ एप्रिल – जून, पृ. ४ – १४.
8. पळशीकर सुहास, २०१४ क, काँग्रेस पीछेहाटीनंतरचे पेच, *अनुभव* दिवाळी, नोव्हेंबर – डिसेंबर, पृ. ५८ – ६१ आणि १६९– ७३
9. Frankel Francine R. and M.S. A. Rao (eds) 1989-90, *Dominance and State Power in Modern India*, Delhi OUP
10. Palashikar Suhas, 2014b, The Defeat of the Congress, *Economic and Political Weekly*, Vol. 49, No. 39,27 September; 57-63
11. Palshikar Suhas, K.C. Suri, Yogendra Yadav, 2014, Normalization of the Post Congress Polity, in Palshikar, Suri, Yadav (eds.) 2014, *Party Competition in Indian States: Electoral Politics in Post-Congress Polity*, New Delhi, OUP; pp 1-41.
12. Rudolph Lloyd I. And Susanne Hoeber Rudolph, 1967, *The Modernity of Tradition: Political Development in India*, New Delhi, Orient Longman.